# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईतील गोरेगाव येथील आरे कॉलनीतील रॉयल पाम कॉम्पलेक्सलगतच्या मोकळ्या जागेत झोपडपट्टीने विळखा घातला असल्याबाबत**

**(१) १२० (२७-०१-२०१५). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगाव येथील आरे कॉलनीतील रॉयल पाम कॉम्पलेक्सलगतच्या मोकळ्या जागेत झोपडपट्टीने विळखा घातला असल्याचे दिनांक ८ ऑक्टोबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पध्दतशीरपणे झोपडीदादांकडून अनधिकृतपणे अतिक्रमण केले जात असूनही त्यांच्याविरुध्द कोणतीच कारवाई होत नसल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये संताप पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली असता अनधिकृत झोपडपट्टी बांधणाऱ्यावर व दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने काय कारवाई केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०५-२०१५) :** (१) आरे दुग्धवसाहतीमधील अनधिकृत बांधकामाबाबत बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. सदर वर्तमानपत्रातील विविध बामत्यांशी साधर्म्य असलेली निनावी तक्रार दि.३०/१०/२०१४ रोजी आयुक्त (दुग्ध) यांचे कार्यालयास प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही. अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यावर तात्काळ निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते. तसेच संबंधितांविरुध्द पोलीसात गुन्हे नोंदविण्यात येतात.

(३) सदर तक्रारीमध्ये नमूद बाबींची चौकशी करण्यात येवून दोषी आढळून आलेल्या एका कर्मचाऱ्यांस निलंबित करण्यात आले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील शासकीय आदिवासी वसतीगृहातील मुलांना शिळे अन्न खावे लागत असल्याबाबत**

**(२) २२६ (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील शासकीय आदिवासी वसतीगृहातील मुलांना शिळे अन्न खावे लागत असून योग्य त्या सोयीसुविधा मिळत नसल्याने अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे हे खरे आहे काय, तसेच शासनाचे मुलांच्या शिक्षण व निवासभत्याकडेही दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक ५ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय ?

(३) असल्यास, चौकशीअंती आदिवासी वसतीगृहातील मुलांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुची (ता.कवठेमहाकांळ, जि.सांगली) येथे मागासवर्गीयांनी दिलेल्या भुखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्याकरिता निधी मंजूर करण्याबाबत**

**(३) २५० (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुची (ता.कवठेमहाकांळ, जि.सांगली) येथील मागासवर्गीय जनतेसाठी मागासवर्गीयांनी दिलेल्या भुखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्याकरिता निधी मंजूर करण्याकरिता संबंधित मा.मंत्री व संबंधित विभागाने आश्वासन देण्यात येवूनही अद्यापी निधी मंजूर करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१४ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्याकरिता निधी मंजूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०५-२०१५) :** (१) व (२) मौजे कुची (ता.कवठेमहंकाळ, जि.सांगली) येथे सांस्कृतिक भवन इमारत बांधकामासाठी आर्थिक मदत मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. तथापि स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (लेखाशीर्ष २२२५ ३६३६) मंजूर करण्याबाबतची नियमावली निश्चित करण्याची कार्यवाही अंतिम झाल्यानंतर याबाबतच्या प्रस्तावांवर निर्णय घेण्यात येणार आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनारी (ता.उरण, जि.रायगड) येथील गावातील मैदानावर अतिक्रमण केल्याबाबत**

**(४) ७७६ (१५-०१-२०१५). श्री. सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनारी (ता.उरण, जि.रायगड) येथील गावातील मैदानावर ग्रामस्थ धार्मिक कार्यक्रम, सार्वलनिक कार्यक्रम इत्यादीसाठी आरक्षित असून या मैदानावर गेल्या अनेक पिढ्या सार्वजनिक गणेशोत्सव व ग्रामवदेवतेची यात्रा भरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास जे.एन.पी.टी. मार्फत या मैदानावर पोलीस स्टेशन उभारणीकरीता भरावाचे काम माहे ऑक्टोबर २०१४ च्या पहिल्या आठवडयात सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ग्रामस्थांकडून विरोध झाल्याने काही काळ हे काम बंद ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, बंद ठेवण्यात आलेले काम माहे नोव्हेंबर २०१४ च्या पहिल्या आठवड्यापासून पुन्हा सुरु झाल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१५) :** (१) व (२) सोनारी (ता.उरण, जि.रायगड) येथील गावातील मैदान धार्मिक कार्यक्रम व सार्वजनिक कार्यक्रम इत्यादीसारठी आरक्षित नसून, या मैदानावर परंपरागत पध्दतीने सण व उत्सव साजरे करण्यात येतात.

(३), (४) व (५) जे.एन.पी.टी. मार्फत या मैदानावर पोलीस स्टेशन उभारणीसाठी ग्रामस्थांनी विरोध केला होता. तथापि हे.एन.पी.टी. अधिका-यासमवेत झालेल्या बैठकित सोनारी, ता.रण, जि.रायगड येथे सार्वजनिक कार्यक्रमासाठी २ एकर जागा जे.एन.पी.टी. ने उपलब्ध करुन देण्याचे मान्य केल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

---

**दोंडाईचा ते सोनगीर हा प्रजिमा क्र.६ (ता.शिंदखेडा, जि.धुळे) या रस्त्याच्या नुतनीकरणाबाबत**

**(५) ८१४ (२२-१२-२०१४). श्री. जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोंडाईचा ते सोनगीर हा प्रजिमा क्र.६ (ता.शिंदखेडा जि.धुळे) या रस्त्यासाठी शासन दरवर्षी कोट्यवधी रूपये खर्च करुनही रस्त्यावरून जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे या रस्त्याची केवळ ३ महिन्यात दुरवस्था होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संपूर्ण रस्त्यांचे नुतनीकरण करणे गरजेचे असल्याने उक्त रस्त्याच्या नुतनीकरणाबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-०४-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) प्रश्नांकीत रस्त्याच्या एकूण ५०.५० कि.मी लांबीपैकी ५ कि.मी. लांबीचे नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले असून १०.६०० कि.मी. लांबीचे नुतनीकरणाचे काम

नुकतेच हाती घेण्यात आले आहे. १२.६० कि.मी. लांबीच्या नुतनी करणाची कामे मंजुर असून निविदा प्रक्रीया पूर्ण होताच कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

उर्वरीत २२.३० कि.मी लांबीच्या मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली पोलीस स्टेशनच्या इमारतीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(६) ८४९ (२२-०३-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली पोलीस स्टेशनच्या इमारतीचे काम गेल्या दोन वर्षापासून रखडलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिस स्टेशनकरिता सुमारे ७७ लाखाचे अंदाजपत्रक असलेल्या या इमारतीसाठी केवळ २० लाखांचा निधी मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पोलिस स्टेशनच्या इमारतीकरिता तुटपुंजा निधी देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त इमारतीचे किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१५) :** (१), (२) व (३) सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणातर्गत रुपये २०.०० लाख इतका निधी उपलब्ध केला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील अंबड व सातपुर या औद्यागिक वसाहतीमध्ये स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्यातबाबत**

**(७) ९०७ (१५-०१-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील अंबड व सातपुर या औद्यागिक वसाहतीमध्ये स्वतंत्र्य पोलीस ठाणे निर्माण करण्यात यावे, अशा प्रकारची स्थानिक जनतेची सातत्याने मागणी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनतेच्या मागणीप्रमाणे शासनाने उक्त ठिकाणी पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत काय कार्यवाही केली.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय,

(४) पोलीस ठाण्यांच्या निर्मितीबाबत शासन तातडीने काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१५) :** (१) होय.

(२) पोलीस आयुक्त नाशिक यांचे अधिनस्त असलेल्या सातपूर व अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नविन चुंचाळे पोलीस स्टेशन निर्माण करण्याचे व विविध संवर्गातील ८२ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबई - गोवा महामार्गावर चिपळूण दरम्यान रस्त्याची झालेली दुरवस्था

**(८) ९१९ (२२-१२-२०१४). श्री. संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) मुंबई - गोवा महामार्गावर चिपळूण दरम्यान रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली असून महामार्गावर मोठे खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,

२) असल्यास, सदर महामार्गाची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर महामार्गाची तातडीने दुरुस्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) पाहणी अंती पावसाळयात रस्त्याच्या पृष्ठभागावर काही ठिकाणी खड्डे आढळून आले होते. पावसाळयात खडीकरण व इमल्शन पध्दतीने खड्डे भरणेचे काम अविरत चालू ठेवण्यात आले होते. पावसाळ्यानंतर डांबराने खड्डे भरणेचे काम करुन घेण्यात आलेले असून रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. खराब पृष्ठभाग दुरुस्तीच्या कामास २०१५-१६ या आर्थिक वर्षात नुतनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### दाभोळ (गुहागर) येथील निरामय रुग्णालय सध्या बंद करण्यात आल्याबाबत

**(९) ९५७ (२२-१२-२०१४). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ (गुहागर) येथील वीज प्रकल्पग्रस्तांसाठी व तेथील जनतेसाठी आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सन १९९९ मध्ये सुरु करण्यात आलेले निरामय रुग्णालय सध्या बंद करण्यात आल्यामुळे तेथील रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालय तातडीने पूर्ववत सुरु करण्याकरीता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरचे रुग्णालय शासनाचे अखत्यारीत नसून ज्ञानप्रबोधिनी मॅनेजमेंट ट्रस्ट, पुणे यांचे मार्फत चालविण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हडपसर मतदार संघातील प्रभाग क्र.४२ मध्ये हिंगणे मळा परिसरातील नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा साठल्याने साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाल्याबाबत**

**(१०) ११६२ (२३-१२-२०१४). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात डेंग्युने थैमान घातलेले असताना हडपसर मतदार संघातील प्रभाग क्र.४२ मध्ये हिंगणे मळा परिसरातील नाल्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा साठल्याने साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवड्यात आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाला परिसरातील कचरा पुणे महानगरपालिकेडून न उचल्याने नाल्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होऊन परिसरात अनेक ठिकाणी पाणी साठल्याने डासांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी भेट दिली असता अधिका-यांनी तातडीने साफसफाई केली जाईल असे सांगितले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबतीत काय उपाययोजना केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) व (२) नाही.

(३) व (४) स्थानिक लोकप्रितनिधींनी भ्रमणध्वनी वरुन याबाबत माहिती दिल्यानंतर आरोग्य अधिकारी यांनी सदर ठिकाणाची साफसफाई करुन घेण्यात येईल असे सांगितले त्यानुसार आरोग्य अधिका-यांनी जागेची पाहणी केली असता, त्याठिकाणी नाल्यामधील चॅनलमध्ये काही प्रमाणात माती व राडारोडा आढळून आला. सदर चॅनल मधील जाळी व राडारोड संबंधीत क्षेत्रिय कार्यालयामार्फत काढण्यात आला आहे.

तसेच पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याच्या किटक प्रतिबंधक विभागामार्फत सदरील नाल्यामधील गवत काढणे व जैविक औषध फवारणी करणे ही कामे करण्यात आली असून वेळोवेळी औषधी फवारणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हडपसर (जि.पुणे) मुंढवा येथे केशवनगरकडे जाण्यासाठी महात्मा फुले चौकात रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांच्या जीवाला धोका असल्याबाबत**

**(११) ११६९ (२३-१२-२०१४). श्री. योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर मतदार संघामध्ये (जि.पुणे) मुंढवा येथे केशवनगरकडे जाण्यासाठी महात्मा फुले चौकात पादचाऱ्यांना धोकादायकरित्या रस्ता ओलांडावा लागत असल्याने गेल्या वर्षभरात या चौकात तीन जणांचा अपघातात मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पादचाऱ्यांची सुरक्षितता धोक्यात आल्याने या ठिकाणी भुयारी मार्ग उभारण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दखल घेऊन सदरहू भुयारी मार्ग बांधण्याबाबत निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) नाही. वरिष्ठ पोलिस निरीजक्षक, मुंढवा पोलिस स्टेशन यांनी (जावक क्रमांक १८७/२०१५) दिनांक १२.१.२०१५ च्या पत्रानुसार महात्मा फुले चौकात प्राणांतिक अपघात घडल्याबाबत पोलिस स्टेशनला नोंद नसल्याचे कळविले आहे.

(२) नाही.

तथापि, सदर ठिकाणी ग्रेड सेपरेटर (भुयारी मार्ग) करणेकरिता माजी कहापौर सौ.चंचला कोद्रे यांनी दिनांक १५.११.२०१४ चे पत्रान्वये सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात या कामासाठी सुमारे २ कोटी तरतूद करणेबाबत कळविले आहे.

(३) व (४) भुयारी मार्ग बांधणेच्या प्रस्तावित ठिकाणी सर्व्हेक्षण करुन सदर भुयारी मार्गाची शक्यता/अशक्यता पडताळणी करण्यासाठी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करुन त्याबाबतचा अहवाल तयार करणे आवश्यक आहे अशा अहवालानंतर भुयारी मार्गाबाबत योग्य तो निर्णय घेणे शक्य होणार आहे.

---

**राज्यातील सन २००७ ते २००९ या कालावधीतील मंजूर जवाहर विहिरीचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याबाबत**

**(१२) १२३० (२३-१२-२०१४). श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ. मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांनी सिंचनाचे साधन म्हणून कोरडवाहू शेतक-यांसाठी जवाहर विहिर योजना राबविण्यात येवूनही सन २००७ ते २००९ या कालावधीतील मंजूर विहिरीचे बांधकाम पूर्ण झाले नसल्याने याची माहिती दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यत देण्यांत आली असता अद्यापही विदर्भातील बरेच जिहयातील विहिरीचे काम पूर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे,

(२) असल्यास, सदर विहरीचे बांधकामाची शासन मुदत वाढ देणार आहे,
(३) असल्यास, केव्हा,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१५) :** (१), (२) व (३) होय.

राज्याती जवाहर / धडक सिंचन विहिरी बाबत शासन स्तरावरुन विभागवार आढावा घेण्यात आला असून अपूण विहिरी पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० जून, २०१५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरातील नागपूर गृह निर्माण क्षेत्रविकास मंडळाने राबविलेल्या गृह निर्माण योजनेचे गाळेधारकांच्या गाळ्यांची रजिस्ट्री नसल्यामुळे आर्थिक दुरावस्थेला समोर जावे लागत असल्याबाबत**

**(१३) १३८८ (२३-१२-२०१४). श्री. सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री. विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री. कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नागपूर गृह निर्माण क्षेत्रविकास मंडळाने राबविलेल्या गृह निर्माण योजनेचे गाळेधारकांच्या गाळ्यांची रजिस्ट्री नसल्यामुळे आर्थिक दुरावस्थेला समोर जात असल्याचे दिनांक ८ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गाळे धारकांना म्हाडा ने ठरवून वाटप केले असून गाळेधारकांनी १९९५ पुर्वी संपूर्ण रक्कम भरली आहेत काय, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, २००८ मध्ये महाराष्ट्र शासनाने अभय योजने अंतर्गत लागु केलेल्या अनुषंगाने गाळे धारकांना मुद्रांक शुल्क भरले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गाळे धारकांना रजिस्ट्री करुन देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, मोफा ॲक्ट नुसार नागपूर सुधार प्रन्यास बिल्डर विक्री करुन देतो तर या गाळे धारकांना रजिस्ट्री न करण्याचे कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) नागपूर शहरातील नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने राबविलेल्या बहुमजली इमारती,बैठे गाळे/भूखंड धारकांच्या काही गाळे/भूखंडाची रजिस्ट्री (अभिहस्तांतरण) ची कार्यवाही पूर्ण झालेली आहे व उर्वरित गाळे/भुखंडाची रजिस्ट्री (अभिहस्तांतरण) करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

म्हाड अधिनियमानुसार बहुमजली इमारतीमधील गाळे धारकांनी मंडळाची थकबाकी/सेवाशुल्क, आपसी व्यवहारावरील मुद्रांकशुल्क, संस्थेचे सभासदत्व स्विकारणे इ.बाबींची पुर्तता करित नसल्याने अभिहस्तांतरण संस्थांच्या नावे करण्यास विलंब होत आहे.

सन २००८ मध्ये महाराष्ट्र शासनाने अभय योजने अंतर्गत मुद्रांक शुल्क भरण्याकरिता वर्तमान पत्रात जाहिरात देऊन जाहिर आव्हान केलेले होते परंतू ज्या गाळे/भूखुंड

धारकांनी शासनाकडे अभय योजने अंतर्गत मुद्रांक शुल्क भरलेले नाही अशा गाळे/ भूखंडधारकांना अभय योजने नंतर मागणी केलेल्या अर्जदारास मुद्रांक शुल्क भरण्यबाबतचे पत्र नागपूर मंडळाकडून देण्यात येते. तरीही अनेक गाळे/ भूखंड धारकांनी मुद्रांक शुल्क भरल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे म्हाडा (मिळकत व्यवस्थापन गाळे विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) अधिनियम १९८१, म्हाडा वसाहतीस लागू असून, सदर अधिनियमातील विनियम २१ (६) नुसार मंडळातील बहुमजली इमारतीमधील गाळ्यांची विक्रीखत व जमीनीचा भुईभाडेपट्टा करार हा गाळेधारकांनी स्थापन करुन पंजीकृत केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस आहे. वैयक्तिक गाळेधारकास अभिहस्तांतरण (विक्रीखत व भुईभाडेपट्टा करार) करणेबाबतची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे सदर अधिनियमातील नियमवालीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत म्हाडा प्राधिकरणास सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळा अंतर्गत वाटप झालेल्या गाळे/ भूखंडधारक यांना म्हाड ॲक्ट नुसार अभिहस्तांतरण करुन देण्यात येते.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(१४) १३९७ (२२-१२-२०१४). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतींची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राजापूर पोलिस ठाण्यांतर्गत ४१ प्रस्ताव गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवून अनेक वर्ष लोटली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे प्रस्तावावर अद्यापपर्यंत निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रस्तावावर तातडीने निर्णय घेऊन या पोलीस कर्मचारी वसाहतीची पुनर्बांधणी किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) नविन निवास्थाने बांधण्याकरिता खर्चाचे अंदाजपत्रके व नकाशे तयार करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे.

---

### लांजा तालुक्यातील (जि. रत्नागिरी) ग्रामीण भागात भातकापणीच्या हंगामात एकूण २२ जणांना संर्पदंश व २६ जणांना विचूदंश झाल्याबाबत

**(१५) १४०६ (२३-१२-२०१४). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा तालुक्यातील (जि. रत्नागिरी) ग्रामीण भागात माहे सप्टेंबर व ऑक्टोबर मध्ये भातकापणीच्या हंगामात एकूण २२ जणांना संर्पदंश व २६ जणांना विंचूदंश झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार पुढे कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१४-०५-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे. ग्रामीण रुगणालय, लांजा जिल्हा. रत्नागिरी येथील रुग्णालयात माहे सप्टेंबर व ऑक्टोबर २०१४ मध्ये भातकापणीच्या हंगामात खालीलप्रमाणे सर्पदंश व विंचूदंशाचे रुग्ण दाखल झालेले असून त्यांचेवर आवश्यक ते औषधोपचार करण्यात आले आहेत.

| **महिना** | **सर्पदंश** | **विंचूदंश** |
|---|---|---|
| सप्टेंबर-१४ | ०६ | १० |
| ऑक्टोबर-१४ | १४ | ०४ |
| **एकूण** | **२०** | **१४** |

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मालवण तालुक्यासह इतर ठिकाणी अनधिकृत वाळू उत्खनन होत असल्याबाबत

**(१६) १४६७ (२२-१२-२०१४). श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मालवण तालुक्यासह इतर ठिकाणी सुरु असलेल्या अनधिकृत वाळू उत्खननावर दिनांक १६ नोव्हेंबर, २०१४ रोजी मालवण तससिलदार यांनी धाड मारुन कारवाई केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या कारवाईचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) सिंधुदुर्ग जिल्हयातील विविध भागामध्ये सुरु असलेल्या अनधिकृत वाळु उपसावर कडक कारवाई करण्यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५) :** (१) व (२) मालवण तालुक्यात वाळूची अवैध वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्याने तहसिलदार मालवण यांनी दिनांक १२/११/२०१४ रोजी मौजे हडी, ता.मालवण येथे वाळू/रेतीची अवैध उत्खनन करणा-या ४ बोटीवर कारवाई केली. तसेच मौजे देवली, आंबेरी, मसुदे व धामापूर ता. मालवण येथील ७२ रॅम्प निकामी करण्यात आले.
(३) वाळू/रेतीची अवैध उत्खनन/वाहतुक होऊ नये याकरिता तहसिलदार कार्यालयाकडून मंडळस्तरावर भरारी पथकांची नियुक्ती करुन कारवाई करण्यात येत आहे.

---

**मुंबई शहरातील माझगांव, लालबाग, शिवडी, माहिम, लोअर परळ, प्रभादेवी, दादर अशा विविध ठिकाणी जुन्या इमारतींच्या जागी मंडळानेच नव्या इमारती उभारण्याचा निर्णय**

**(१७) १५३० (२३-१२-२०१४). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील माझगांव, लालबाग, शिवडी, माहिम, लोअर परळ, प्रभादेवी, दादर अशा विविध ठिकाणी जुन्या इमारतींच्या जागी मंडळानेच नव्या इमारती उभारण्याचा निर्णय म्हाडा प्राधिकरणाने घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (११-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने संपादित केलेलया उपकरप्राप्त इमारती व त्याखालील भुखंडांच्या पुनर्विकासासंबंधी धोरण ठारविण्यासंदर्भात घेतलेल्या दि. २४ ऑक्टोबर, २०१३ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या बैठकीतील ठरावानुसार अशा २१ योजना महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणाद्वारे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यात लोअर परेल, माझगांव, शिवडी, माहिम, प्रभादेवी, दादर येथील मालमत्तांचा समावेश आहे.
(२) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) ठरावाच्या अनुषंगाने म्हाडाने संपादित केलेलया २१ मालमत्तांच्या पुनर्विकासांकरीता आशयपत्र (LOI) देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जात पडताळणी कार्यालयामध्ये जात पडताळणीकरीता आलेल्या अर्जांवर कार्यवाही होत नसल्याबाबत**

**(१८) १६४२ (२२-१२-२०१४). डॉ. सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्याच्या जात पडताळणी कार्यालयात ग्रामपंचायत निवडणुकीसाठी जात पडताळणीसाठी दाखल केलेले प्रमाणपत्र अद्याप पर्यंत पडताळणी करुन मिळाली नसल्याची तसेच ग़त दोन वर्षापासून शेकडो प्रस्ताव जात पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे सन २०१२-१३ या वर्षात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागासवर्गीय समाजातील जातीचे प्रमाणपत्र वैध करण्यासाठी सहा महिने ते एक वर्षाचा कालावधी लागत असल्यामुळे मागासवर्गीय समाजाने जिल्ह्याधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर जातपडताळणी कार्यालयात अनेक प्रस्ताव दोन वर्षापासून प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत, त्यानुषंगाने उक्त प्रमाणपत्र ताबडतोब मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

विभागीय जात पडताळणी समिती क्र.२ लातूर समितीकडे लातूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणूकीसाठी जात पडताळणी समितीकडे एकूण ११९९ इतके प्रस्ताव प्राप्त झाले असून ११९९ प्रस्ताव निकाली काढण्यात आलेले आहेत.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाने उपकरप्राप्त इमारतीच्या पुर्नविकास आणि त्यातून मिळालेल्या अतिरिक्त घरांची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे स्पष्ट आदेश राज्य माहिती आयुक्तांनी दिल्याबाबत**

**(१९) १६९८ (२३-१२-२०१४). श्री. बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने उपकर प्राप्त इमारतीच्या पुर्नविकास आणि त्यातून मिळालेल्या अतिरिक्त घरांची माहिती उपलब्ध करुन द्यावी असे स्पष्ट आदेश राज्य माहिती आयुक्तांनी दिले असताना म्हाडा प्रशासन मागील दोन महिन्यापासून दुर्लक्ष करीत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची सविस्तर चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने म्हाडाकडून होत असलेल्या दुर्लक्षितपणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) राज्य माहिती आयुक्त यांचेकडे दि. ३०.०७.२०१४ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अर्जदाराने अपेक्षित केलेली माहिती त्यांस एक महिन्यांच्या आत उपलब्ध करुन देण्यबाबतचे आदेश राज्य माहिती आयुक्त यांचेद्वारे मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना देण्यात आले. सदर आदेशाच्या अनुषंगाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दिनांक २६.०८.२०१४, १९.११.२०१४ व दिनांक २४.१२.२०१४ च्या पत्रान्वये सर्व आवश्यक माहिती अर्जदारास उपलब्ध करुन दिलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत प्राप्त झालेला सुमारे २८ कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाला वर्ग केल्याबाबत**

**(२०) १९०३ (२२-१२-२०१४). श्री. विलास तरे (बोईसर), श्री. हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१२-२०१३-१४ या २ वर्षाकरीता ठाणे जिल्हापरिषदेला राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत एकूण किती निधी प्राप्त झाला,
(२) सदरहू प्राप्त झालेल्या निधीतून ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील एकूण किती लाभार्थींना घरकूल योजनेचा फायदा मिळाला,
(३) ठाणे जिल्हा परिषदेला सदरहू योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या सुमारे २८ कोटी रुपयांचा निधी पुन्हा राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, गरजू लाभार्थींना या योजनेतून घरकूले न देता २८ कोटींना निधी परत शासनाकडे वर्ग करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-०५-२०१५) :** (१) सन २०१२-२०१३-१४ या २ वर्षाकरीता प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद ठाणे यांना राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेअंतर्गत एकूण रु.३२९९.८७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(२) सदर निधीमधून ठाणे जिल्ह्यात १८ व पालघर जिल्ह्यात ७२६ अश्या एकूण ७४४ लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.
(३) होय, खरे आहे.
(४) घरकुलाचा लाभ देण्यासाठी प्रतीक्षा यादीत लाभार्थी शिल्लक नसल्याने ठाणे जिल्हा परिषदेकडे शिल्लक असलेला निधी व त्यावरील जमा व्याज मिळून एकूण रु.२९,१०,३१,१७०/- निधी शासनास परत करण्यात आला आहे.

---

**ठाणे जिल्हा परिषदेस रमाई आवास योजनेअंतर्गत शासनाकडून प्राप्त झालेल्या निधी संदर्भात**

**(२१) १९१४ (२२-१२-२०१४). श्री. विलास तरे (बोईसर), श्री. हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामिण व शहरी भागातील अनुसुचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचावे यासाठी त्यांना घर बांधण्यासाठी शासनाकडून रमाई अवास घरकुल योजनेंतर्गत निधी देण्यात येणार, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेंनुसार शासनाकडून ठाणे जिल्हा परिषदेकडे सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ तसेच सन २०१४-२०१५ या वर्षासाठी एकूण किती निधी प्राप्त झाले आहे,

(३) अस्ल्यास, प्राप्त झालेल्या निधीतून एकूण किती लाभार्थ्यांना रमाई आवास घरकुले बांधुन देण्यात आली आहेत,

(४) तसेच, सन २०१३-२०१४ व २०१४-२०१५ या २ वर्षात ठाणे जिल्हा परिषदेला रमाई आवास योजनेंसाठीचा निधीच प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०५-२०१५) :** (१) होय.

अनुसूचित जातीच्या लोकांना घरे बांधण्यासाठी रमाई आवास योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून निधी देण्यात येतो.

(२) रमाई आवास योजनेकरीता ठाणे जिल्हा परिषदेकडे

सन २०१२-१३ मध्ये रु. २२७.९५ लक्ष.

सन २०१३-१४ मध्ये रु. ३५.०० लक्ष.

सन २०१४-१५ मध्ये रु. ३.०० लक्ष.

असा एकूण रु. २६५.९५ लक्ष निधी प्राप्त झाला आहे.

(३) एकूण ३३० लाभार्थ्यांना घरकुले बांधून देण्यात आलेली आहेत.

(४) रमाई आवास योजनेकरीता ठाणे जिल्हा परिषदेला सन २०१३-१४ मध्ये रु.३५.०० लक्ष इतकी तरतूद प्राप्त आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये रु.३.०० लक्ष इतकी तरतूद प्राप्त आहे.

---

**चाळीसगाव-औरंगाबाद मार्गावर असलेल्या कन्न्ड घाटाची**
**संरक्षक भिंत व रस्त्याची दुरवस्थेबाबत**

**(२२) १९६० (२२-१२-२०१४). श्री. उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव-औरंगाबाद मार्गावर असलेल्या कन्न्ड घाटाची संरक्षक भिंत व रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहतूकीस अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने सदर समस्या उद्भवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याची डागडूजी करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे वा केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही. घाटातील रस्ता नागमोडी वळणाचा असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) NHAI मार्फत प्राप्त निधीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याची डागडुजी करुन वाहतुक सुरळीत ठेवली जात आहे. तसेच NHAI कडून सदर रस्त्याचे घाटात चौपदरीकरण प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय व संस्थामार्फत सुरु असलेल्या आश्रमशाळांमधील**
**शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनासंदर्भात**

**(२३) २१०० (२२-१२-२०१४). श्री. भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय व संस्थामार्फत मागविल्या जाणा-या आश्रम शाळांना देण्यात येणा-या अनुदानांत तसेच दोन्ही आश्रम शाळेतील शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या पगारात तफावत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२२-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) आदिवासी विभागांतर्गत खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या अनुदानित आश्रमशाळेतील व शासकीय आश्रमशाळेतल माध्यमिक मुख्याध्यापक, कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक, माध्यमिक शिक्षक, प्राथमिक मुख्याध्यापक, पदवीधर प्राथमिक शिक्षक, अधिक्षक (स्त्री/पुरुष), कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा परिचर, शिपाई, स्वयंपाकी, कामाठी इ. सर्व पदांना देण्यात येणा-या वेतनश्रेणीत कोणताही फरक नाही. तथापि, शासकीय आश्रमशाळेतील चौकीदार या पदाची वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे १३००/- आहे. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग दि.२३.१.२०१४ अन्वये अनुदानित आश्रमशाळेतील पहारेकरी / सुरक्षारक्षकांची पदे रु.३२००/- दरमहा इतक्या एकत्रित मानधनावर भरण्यात यावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पोलिस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकरीता कुटुंब कल्याणकारी योजनेबाबत

**(२४) २१३१ (१५-०१-२०१५). श्री. बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकरीता असलेल्या आरोग्य कुटुंब कल्याणकारी योजनेमध्ये पोलिसांना केवळ आपातकाल उपचार प्राप्त होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील अनेक जिल्हा केंद्रांवर या योजनेत सामील होणारे एकही रुग्णालयांचा समावेश नसल्यामुळे लाभार्थींना उपचाराकरीता नागपूरला यावे लागत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेमध्ये भौतिकोपचारा करीता लागणाऱ्या खर्चाचा (जसे अँजिओग्राफी, स्कॅनिंग, एम.आर.आय) समावेश नाही आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या पोलिस कुटुंब कल्याणकारी योजनेत जिल्हा कैंद्रांवरील दवाखान्यांचा समावेश करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१५) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवर समावेश असलेल्या हॉस्पीटल मध्ये दाखल झालेल्या पोलीस कर्मचारी/अधिका-यांना उपचारादरम्यान या सर्व सोयी आंतररुग्ण म्हणून उपलबध होतात. तथापि रुग्णालयामध्ये दाखल न होता अशा चाचण्या करण्याकरिता सदरची सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जळगांव शहरातील महामार्ग क्रमांक ६ वर अजिंठा चौफुली ते पाळधी पर्यंत हायवे साईट पट्टी नसल्यामुळे अपघात होत असल्याबाबत

**(२५) २१९७ (२२-१२-२०१४). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) जळगांव शहरातील प्रामुख्याने महामार्ग क्रमांक ६ वर अजिंठा चौफुली ते पाळधी पर्यंत अनेक अपघात होत असून सर्वसाधारण हायवे साईट पट्टी नसल्यामुळे सदर अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघात रोखण्यासाठी प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) भारत सरकार राजपत्र दि.१.४.२०१३ अन्वये नागपूर-धुळे-सुरत रस्ता रा.म.क्र. ६ हा चौपदरीकरणासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे वर्ग झाला असून अजिंठा चौफुली ते पाळधी पर्यंत लांबीच्या त्यामध्ये समावेश आहे. त्याअनुषंगाने साईडपट्ट्या मुरमाने भरण्याचे अंदजापत्रक प्रकल्प संचालक औरंगाबाद (NHAI) यांना सादर केले असून पाठपुरावा सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी शहराला नगरपरिषदेचा दर्जा मिळण्याबाबत**

**(२६) २२१८ (२३-१२-२०१४). श्री. कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी शहराची लोकसंख्या ३५ हजाराच्या जवळपास असुन शहराचा भौगोलिक विकास ४ कि.मी. असून शहरामध्ये नवीन वस्त्या मोठ्या प्रमाणावर तयार होत आहेत, परंतु ग्रामपंचायत असल्यामुळे तेथील नागरिकांना सोयी सुविधा मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील नागरिकांना सोयीसुविधा व इतर सुविधा मिळण्याकरीता आरमोरी शहराला नगरपरिषदेचा दर्जा मिळण्याची मागणी तेथील नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केव्हापर्यंत उक्त कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी या तालुका मुख्यालय असलेल्या ठिकाणी नगरपंचायत स्थापन करण्याबाबत शासनाचा हेतु असल्याबाबतची उद्घोषणा क्रमांक एमसीओ २०१३/प्र.क्र.८४/भाग-१/नवि१४, दिनांक ०१.०३.२०१४ अन्वये राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

---

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे 'कवयित्री बहिणाबाई चौधरी' विद्यापीठ असे नामकरण करण्याबाबत**

**(२७) २३८९ (२२-१२-२०१४). श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ असे नामकरण करण्याबाबत विविध मान्यवर व जनतेने सुचित केलेल्या विविध नावावर विचार विनिमय करण्यासाठी विद्यापीठामार्फत समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निर्णय होण्याच्या दृष्टीने व सविस्तर चर्चा करण्यासाठी समितीची पुढील सभा आयोजित करण्याच्या सूचना समिती अध्यक्ष यांनी विद्यापीठास दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त समितीच्या आतापर्यंत किती बैठका घेण्यात आल्या व त्यात कोणता निर्णय घेण्यात आला,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१४-०५-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) समितीची आतापर्यंत एक बैठक घेण्यात आली असून त्यामध्ये विद्यापीठ नामकरण संदर्भात प्राप्त झालेल्या विविध प्रस्तावांबाबत चर्चा झाली. सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने सर्व सदस्यांच्या उपस्थितीत विस्ताराने चर्चा व्हावी असे बैठकीत ठरले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयाची क्षेत्रीय कार्यालयातील गट-अ ते ड संवर्गातील रिक्त पदे न भरण्याबाबत**

**(२८) २५७७ (२२-१२-२०१४). श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयाची निर्मिती होऊन १६ वर्षे झाली असून जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील गट-अ ते ड संवर्गातील सुमारे ९५ पदे रिक्त असल्याची माहिती नोव्हेंबर, २०१४ मध्ये उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पदे अद्यापही रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्या, ही पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्या, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१) व (२) वाशिम जिल्हयात गट-अ मधील उपजिल्हाधिकारी संवर्गातील-२ तहसिलदार संवर्गातील-२ जिल्हा खनिकर्म अधिकारी गट-अ चे १ अशी ५ पदे व गट-ब मधील सहायक नियोजन अधिकारी (नियोजन विभाग)-१ सहायक नियोजन अधिकारी (मानव विकास मिशन) -१ नायक तहसिलदार-१ प्रशासन अधिकारी (नगर पालिकार) - १ पद अशी ४ पदे तसेच गट-क मधील ५७ पदे व गट-ड मधील १० पदे अशी एकूण ७६ पदे रिक्त आहेत.
(३) गट - क संर्वगातील कनिष्ठ लिपिक व तलाठी यांच्या पदभरतीकरिता जिल्हाधिकारी यांनी परिक्षा घेऊन कनिष्ठ लिपिक पदी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या

आहेत व तलाठी पदी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. गट अ व ब ची रिक्त पदे भरण्याचे अनुषंगाने शासन व विभागीय आयुक्त स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव शहरातील पोलीस वसाहत अत्यंत मोडकळीस आल्याबाबत**

**(२९) २६३४ (१५-०१-२०१५). श्री. सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील पोलीस वसाहतील इमारती गेल्या कित्येक वर्षापासून अत्यंत मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती उपाय योजना करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०५-२०१५) :** (१) होय.
(२) जळगाव येथील पोलीस निवासस्थानांच्या दुरुस्तीकरिता रुपये ३.९८ कोटी इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. पोलीस मुख्यालय आवारातील टाईप-२ व टाईप-४ ची निवास्थाने बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना येथील सार्वजनिक बांधकाम उप विभाग येथील रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत**

**(३०) ३०९४ (२२-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम उप विभाग जाफ्राबाद (जि.जालना) यांचेकडे बस आगार प्रमुख सुरेश मेहेत्रे यांना दिनांक १७ सप्टेंबर ते १ नोव्हेंबर, २०१४ या काळात शहरातील प्रमुख रस्त्याच्या दुरुस्तीबाबत पत्रव्यवहार केला, हे खरे आहे काय,
(२) तसेच टेंभूर्णी-जाफ्राबाद (जि.जालना) या आठ कि.मी रस्त्यावर अनेक खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांना प्रचंड त्रास होत असून अनेक अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत उपविभागाच्या अंतर्गत अनेक रस्ते खराब अवस्थेत असून ते सुधारण्यासाठी अनेकवेळा नागरीकांनी व लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार निधी अभावी किंवा संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे विकासकामे होत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने या प्रकरणी काय कारवाई केली अथवा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) होय.
(४) उपलब्ध निधीनुसार कामे हाती घेण्यात येत आहेत, त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना शहरातील नगरपालिका हद्दीतील रस्त्यांची झालेली दुरावस्था**

**(३१) ३१०७ (२२-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना शहरातील नगरपालिकेच्या क्षेत्रात सार्वजनिक बांधकाम खात्याचे प्रमुख (बायपास) रस्त्याचे काम मंजूर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे वाहन धारकांना त्रास होत असून अपघाताचे प्रमाण वाढले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ व २ अधिकाऱ्यांनी सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीबाबत दुर्लक्ष केले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) होय.
जालना वळण रस्ता (प्ररामा-१२) या रस्त्याच्या ८.०० कि.मी. लांबीपैकी ०.०० ते ५.२०० या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम मंजूर असून ते प्रगतीत आहे. जालना वळण रस्ता (प्ररामा-२) या ९.०० कि.मी. लांबीच्या रस्त्यावर पडलेले खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना राजूर भोकरदन रस्त्यांची झालेली दुरावस्था**

**(३२) ३१२२ (२२-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना-राजूर-भोकरदन रस्त्याची दुरावस्था झालेली असून रस्ता दुरुस्तीसाठी अनेक आंदोलने करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्याचे चौपदरीकरण करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले तसेच रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लाखो रु.खर्च करुन रस्त्याची सुधारणा न होता गैरव्यवहार झाला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
रस्त्यांची दुरावस्था झाली होती. परंतु डांबर मिश्रीत खडनी खड्डे भरून रस्ता सुस्थितीत करण्यात आला आहे.
(२) कैंद्रित मार्ग निधी अंतर्गत सदर रस्ता सुधारणेचे काम मंजूर असून काम सुरु करण्याची कार्यवाही प्रगती पथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना-राणीउचेगांव-घनसावंगी राज्य रस्ता क्र.३० रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(३३) ३१२७ (२२-१२-२०१४). श्री. अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना-राणीउंचेगाव-घनसावंगी या राज्य रस्ता क्र. ३० रस्त्यांची अत्यंत दयनिय अवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रस्ता चार पदरी करण्याची मागणी परिसरातील नागरीकांनी व लोकप्रतिनिधींनी केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. सदरील रस्त्यांची चौपदरीकरणाची मागणी मंडळाकडे केलेली नाही. गट ब अंतर्गत रु. ५०.०० लक्ष किंमतीचे काम १३ व्या वित्त आयोगाअंतर्गत मार्च, २०१५ अखरे पुर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित कामे मंजर असून सद्यस्थितीत प्रगती पथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण व मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) खाडीपट्टयामध्ये सक्शन पंपाद्वारे वाळू उत्खनन होत असल्याबाबत**

**(३४) ३१६३ (२२-१२-२०१४). श्री. सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण व मंडणगड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) खाडीपट्टयामध्ये म्हाप्रळ खाडी पात्रात तसेच खाडीकिनाऱ्यांवरील काही गावांमध्ये हातपाटी व सक्शन पंपाद्वारे वाळू उत्खनन सातत्याने सुरू असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये महसूल विभागाने काही भागामध्ये छापे मारून शेकडो ब्रास वाळू तसेच व १५ सक्शन पंप जप्त करण्यात आले आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणी संबंधित वाळू उत्खनन करणाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी स्थापन केलेल्या भरारी पथकाद्वारे नियमित कारवाई करण्यात येते. नोव्हेंबर, २०१४ मध्ये केलेल्या तपासणीमध्ये मौजे गोवळकोट, ता.चिपळून येथे ८१ ब्रास वाळूचा अवैध साठा केल्याचे आढळून आल्याने संबंधितांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील भरारी पथकाद्वारे संयुक्तरित्या केलेल्या तपासणी १५ सक्शन पंप बंद स्थितीत आढळून आले.

तहसिलदार मंडणगड यांनी केलेल्या तपासणी म्हाप्रळ खाडीकिनारी विनापरवाना ९३ ब्रास वाळूसाठा आढळून आल्याने, संबंधितांना दंडाची नोटीस बजावण्यात आली असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**जव्हार (जि.ठाणे) येथे आदिवासी मुलींच्या वसतिगृहामध्ये विद्यार्थींनी गरोदर असल्याबाबत**

**(३५) ३२०६ (२२-१२-२०१४). डॉ. बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.ठाणे) अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी मुलींच्या वस्तीगृहातील एक विद्यार्थीनी गरोदर असल्याचा प्रकार दिनांक ६ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने या प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) अद्याप याप्रकरणी चौकशी पुर्ण झाली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतीच सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

मात्र दि.७.११.२०१४ रोजी दैनिक पुढारी या स्थानिक वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्दीस आली आहे.

(२) होय.

वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जव्हार यांनी दि.१८.११.२०१४ रोजी चौकशी केली.

(३) वसतीगृहातील विद्यार्थीनींपैकी कोणत्याही विद्यार्थीनीसंबंधी अशी घटना घडल्याचे चौकशीत निदर्शनास आले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक औषध विक्रीच्या दुकानात फार्मासिस्ट असण्याबाबत**

**(३६) ३२५० (१५-०१-२०१५). श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक औषध विक्रीच्या दुकानात फार्मासिस्ट असावा व त्यानेच औषधे विकावीत असा शासनाचा नियम आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्याच्या विविध भागातील अनेक औषधांच्या दुकानात १० वी, १२ वी नापास तसेच पात्र नसलेल्या युवकांकडून कमी पगारात फार्मासिस्टचे काम करवुन घेतले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉक्टरांकडून लिहुन दिलेली औषधे ओळखून योग्य औषधे ग्राहकांना देणे, यासाठी कायद्यानुसार प्रशिक्षित व्यक्ति (फार्मासिस्ट) औषधाच्या दुकानात नेमण्यात यावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट (२१-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५ अंतर्गत नियम ६५ मधील तरतुदीनुसार प्रत्येक किरकोळ औषध विक्री आस्थापनेत रजिस्टर्ड फार्मासिस्ट असावा व त्याच्या देखरेखीखालीच वर्गीकृत औषधांची विक्री करावी अशी कायद्याची तरतुद आहे.

(२) हे खरे नाही.

(३) रजिस्टर्ड फार्मासिस्टची नेमणूक केल्यानंतरच अन्न व औषध प्रशासनामार्फत अर्जदारास किरकोळ औषध विक्री साठीचे परवाने मंजूर करण्यात येतात.तसेच औषध निरीक्षकांमार्फत सदर औषध विक्री आस्थापनांच्या नियमित व आकस्मित तपासण्या करण्यात येतात. या तपासणीदरम्यान इतर तरतुदींच्या अनुपालनासोबत रजिस्टर्ड फार्मासिस्टची उपस्थितीदेखील कटाक्षाने पडताळली जाते. रजिस्टर्ड फार्मासिस्टच्या गैरहजेरीत औषध विक्री केल्याचे आढळल्यास संबंधित औषध दुकानांविरुद्ध औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार उचित करावाई करण्यात येते.

---

**पुणे महानगर परिवहन महामंडळ (PMPML) सुरु केलेल्या ई तिकिटिंग मशीन्सच्या वापराचा ठेका एका खाजगी कंपनीला दिला असल्याबाबत**

**(३७) ३३७१ (२३-१२-२०१४). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ (PMPML) सुरु केलेल्या ई तिकिटिंग मशीन्सच्या वापराचा ठेका एका खाजगी कंपनीला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई तिकिटिंग मशीन्सचा वापर व त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे लेखापरीक्षण झाले नाही व याचा कुठलाही अभिलेख ठेवण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजवर ई तिकिटिंग मशीन्सचे ऑडीट झाले नसल्याने कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) होय.

पुणे परिवहन महामंडळाने ई-तिकीटींगचा ठेका बी.ओ.टी. तत्वावर देण्याबाबत मे.वंश इन्फोटेक प्रा.लि. यांच्यासोबत दि.२२.३.२०१२ अन्वये करार केला होता. तथापि, प्रा मे. वंश इन्फोटेक. लि. हे सक्षमपणे वितरण व्यवस्था पुरवू शकली नसल्याने तसेच त्यांनी करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे ठेका रद्द करण्याबाबत पुणे परिवहन महामंडळाने ठराव क्र. ६१, दिनांक १८.१०.२०१३ पारित केला व त्यानुसार दिनांक १४.१.२०१५ पासून मे.वंश इन्फोटेक प्र.लि. यांच्याकडून पुरविण्यात येणारी संपूर्ण ई-तिकिटिंग व्यवस्था बंद करण्यात आली.

(२) व (३) ई-तिकीट मशीनद्वारे प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा अभिलेखा (समरी रिपोर्ट) नुसार लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष उत्पन्न परिवहन महामंडळास प्राप्त होत होते. तसेच लेखा परिक्षणाची कार्यपध्दती योगय प्रकारे राबविण्यात आली होती.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धनसावंगी (जि.जालना) येथे गोदावरी नदीवरील वाळूचा लिलाव झालेला नसतानाही मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याबाबत**

**(३८) ३४१६ (२२-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनसावंगी (जि.जालना) येथे गोदावरी नदीवरील वाळूचा लिलाव झालेला नसतानाही मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर २०१४ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध होत असलेला वाळू उपसा त्वरीत थांबविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०५-२०१५) :** (१) व (२) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी स्थापित भरारी पथकांमार्फत नियमितपणे कारवाई करण्यात येते. तहसिलदार घनसावंगी यांच्या पथकाने माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वाळूची अवैध वाहतुक करणा-या ९ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन दंड वसूल केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला शहरात अल्पवयीन मुलांकडून अवैधरित्या दारुची विक्री व वाहतूक करण्यात येत असल्याबाबत**

**(३९) ३९५६ (१५-०१-२०१५). श्री. रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरात अल्पवयीन मुलांकरवी दारु विक्री करणे, दारु बाटलीचे पार्सल हातात देणे, ते प्रतिबंधात्मक असताना सुध्दा अशी विक्री वा पार्सल देण्याचा प्रकार राजरोसपणे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीअंती दोषी आढळलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) याबाबत अकोला शहरात एकही गुन्हा उघडकीस आलेला नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) येथील गणेशत्सवाच्या प्रसंगी काही समाज कंटकांनी गणेश मुर्तीची विटंबना केल्याबाबत**

**(४०) ३९७७ (१५-०१-२०१५). श्री. मदन येरावार (यवतमाळ), श्री. राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरखेड (जि.यवतमाळ) येथे दिनांक २९/०८/२०१४ रोजी गणेश उत्सवाच्या प्रसंगी उमरखेड शहरातील गणेश मित्र मंडळाच्या मिरवणुकीवर एका समाजाच्या काही समाज कंटकांनी धर्मिक ठिकाणातून दगडफेक करून गणेश मुर्तीची विटंबना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस शिपाई जखमी झाल्याने गणेश भक्तांवर सदर पोलीसाच्या जबानीवरुन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, परंतु सदर पोलीस घटनेपूर्वीपासूनच अपघातात जखमी झाला असल्याने त्याच्यावर डॉ.अरूण बंग यांच्याकडे उपचार सुरू असतांना खोट्या जबाबावरुन गणेश भक्तांवर गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेच्या ठिकाणी झालेल्या व्हिडीओ शुटींग वरून मुख्य आरोपींना अद्याप पर्यंत अटक न होणे, यावरून स्थानिक नागरीकांमध्ये पोलीस विषयी संभ्रमाची भावना निर्माण होणे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे, त्यानुसार संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?
(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३) उमरखेड येथे गणपती स्थापनेची मिरवणूक प्रत्येक मंडळ वेगवेगळी काढत असल्याने व मिरवणूकीची वेळ निश्चित नसल्यामुळे दिनांक २९ ऑगस्ट, २०१४ रोजी गणेश स्थापना मिरवणूकीची पोलीस स्टेशनतर्फे व्हिडीओ शुटींगची व्यवस्था करण्यात आली नव्हती. या प्रकरणी मुख्य आरोपीसह एकूण ३८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. स्थानिक नागरिकांमध्ये पोलीसांविषयी संभ्रमाची भावना निर्माण झाली नाही.
(४) या प्रकरणी पोलीस स्टेशन उमरखेड येथे एकूण ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(१) गु.र.क्र.२३०/२०१४, भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, २९५, ३२४, ३४१, ३३६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून एकूण १४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) गु.र.क्र. २३१/२०१४ भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३३६, ४२७ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आला असून एकूण ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) गु.र.क्र.३३२/२०१४ भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३५३, ३३२, ३३६, ३२६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून एकूण १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सर्व अटक आरोपींविरुध्द कलम सी.आर.पी.सी. कलम ११० अन्वये प्रतिबंधक कार्यवाहीसुध्दा करण्यात आली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे घाटंजी वनपरिक्षेत्र (जि.यवतमाळ) अंतर्गत रस्त्याच्या कामातील वनधिकाऱ्यांकडून अवैध पध्दतीने वृक्षतोड करुन विक्री करुन केलेला गैरव्यवहार

**(४१) ३९७९ (२२-१२-२०१४). श्री. मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे घाटंजी वनपरिक्षेत्र (जि.यवतमाळ) येथील वनविभागाच्या मौजे इंजाळा ते येरंडगाव रस्तावरील नर्सरीसाठी रस्ता करताना मुख्य वनसंरक्षक कार्यालय यवतमाळ यांची परवानगी न घेता रस्त्याचे काम करण्यात आल्याची घटना दिनांक १० जुलै, २०१३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उक्त वनपरिक्षेत्रातील साखरा, कोपरा पिंप्री वर्तुळातील महसूल व आदिवासी विभागाच्या जमिनीवरील वनधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदा वृक्षतोड करुन त्यांची परस्पर

विक्री मालकी सर्वेमध्ये दाखवून केल्याप्रकरणी उप वनसंरक्षक यवतमाळ यांचेकडून चौकशी करण्याचे आदेश फिरत्या पथकाला दिनांक ०९ जुलै, २०१३ रोजी व त्यासुमारास दिले आहेत हे खरे आहे काय,

(३) प्रश्न क्र. १ व २ च्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी केली काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व या प्रकरणी दोषी असणाऱ्याविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) उपवनसंरक्षक, यवतमाळ यांनी सहायक वनसंरक्षक यांना साखरा, कोपरा, पिंपरी या वर्तुळातील झालेल्या वृक्षतोडीच्या अनुषंगाने चौकशी करण्याच्या मौखीक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तेथील तपासणी केली असता आदिवासी शेत सर्व्हे नंबर ५ येथे मौजा कोपरा येथील आदिवासी कास्तकाराच्या शेतातील साग झाडे विना परवानगीने तोडली असल्याचे दि. २२.०६.२०१३ रोजी आढळून आले. सबब याबाबत गुन्हा नोंदवून साग नग ७० घ.मी.२.६३५ वजनाचा माल जप्त करुन जोडमोहा डेपोवर जमा केला आहे.

साखरा व पिंपरी वर्तुळातील महसूल विभागाच्या व आदिवासी कास्तकारांच्या जमीनीवर वृक्षतोड झालेली नाही.

---

## वाशिम जिल्हयातील रिसोड व शिरपूर जैन (ता.मालेगांव) येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचे इमारत बांधकामासाठी निधी उपलब्धतेबाबत

**(४२) ४२७३ (२२-१२-२०१४). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील रिसोड व शिरपूर जैन (ता.मालेगांव) येथील दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नविन इमारत बांधकामाच्या प्रस्तावास गेल्या २ वर्षापूर्वी शासनाने मान्यता दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप पर्यंत या बांधकामासाठी शासनामार्फत किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे,

(४) नसल्यास, या प्रस्तावाचे इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१) होय, दुय्यम निबंधक, रिसोड व दुय्यम निबंधक, शिरपूर या कार्यालयांची नवीन इमाररत बांधकामास महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.आस्थापना-२०१२/३७५/प्र.क्र.७९/म-१, दिनांक ३०/०६/२०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) दुय्यम निबंधक, रिसोड, जि.वाशिम या कार्यालयाच्या नवीन बांधकामाकरीता अर्थसंकल्प २०१३-२०१४ पर्यंत रु.२० लाखांचा निधी, तसेच अर्थसंकल्प सन २०१४-२०१५ मध्ये रु.७५ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. दुय्यम निबंधक, शिरपूर, जि.वाशिम या कार्यालयाच्या नवीन बांधकामाकरीता आतापर्यंत रु.७५ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व त्याचे अधिनस्त कार्यालयातील गट "अ" व "ब" संवर्गातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत**

**(४३) ४२८८ (२२-१२-२०१४). श्री. अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व त्याचे अधिनस्त कार्यालयातील गट "अ" व "ब" संवर्गातील अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अप्पर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी तहसिलदार, नायब तहसिलदार, लेखाधिकारी, खणीकर्म अधिकारी, उपअभियंता, संशोधन सहाय्यक यासारखी रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक २०.०८.२०१३ व ६.१०.२०१३ च्या दरम्यान मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे शासकीय यंत्रणेत व जनतेला मिळण्याच्या सुविधा व प्रश्नांचा निपटारा यावर विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१), (२) व (३) वाशिम जिल्ह्यात गट-अ मधील उपजिल्हाधिकारी संवर्गातील २ तहसिलदार संवर्गातील २, जिल्हा खनिकर्म अधिकारी १, अशी ५ पदे व गट-ब मधील सहायक नियोजन अधिकारी (नियोजन विभाग)-१ सहायक नियोजन अधिकारी (मानव विकास मिशन) -१ नायब तहसिलदार -१, प्रशासन अधिकारी (नगर पालिका)-१ एकूण ४ अशी एकूण ९ पदे रिक्त आहेत. तथापि, सदर रिक्त पदांमुळे शासकीय यंत्रणेत व जनतेला मिळण्याच्या सुविधा व प्रश्नांचा निपटारा यावर विपरीत परिणाम होत आहे अशी वस्तुस्थिती नाही.

(४) सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासन व विभागीय आयुक्त स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निसर्गाच्या लहरीपणामुळे राज्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सोयाबीन पिकांचे उत्पन्न कमी झाल्याबाबत**

**(४४) ४३०४ (२२-१२-२०१४). ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सोयाबीन पिकांचे उत्पन्न निसर्गाच्या लहरीपणामुळे एकरी एक क्विटल पेक्षासुध्दा कमी उत्पन्न झाले असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातच कर्ज बाजारीपणाचे प्रमाण वाढल्याने बँकेच्या कर्जाबाबत शासन शेतकऱ्यांना सूट देणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली असल्यास शेतकऱ्यांना भरीव नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१४-०५-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित झालेल्या गावातील शेतक-यांच्या सहकारी पीक कर्जाचे रुपांतरण व शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याबाबत शासन परिपत्रक क्र.गारपीट ०११५/प्र.क्र.१०६/२-स दिनांक ११ मार्च, २०१५ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच विदर्भ व मराठवाडयातील परवानाधारक सावकारांकडून कर्ज घेतलेल्या २.२३,१५७ शेतक-यांचे कर्ज व कर्जावरील व्याज संबंधित सावकारास अदा करुन शेतक-यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय १२ मार्च, २०१५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेला आहे.

(३) राज्यातील एकूण ३९४३४ गावांपैकी २३८११ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आल्याने सदर गावांत टंचाईसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली. बाधित गावांतील शेती/फळपिकांखालील एकूण ११२.७२ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झालेले आहे. केंद्र शासनाच्या प्रचलित दराप्रमाणे, जिरायत पिकांसाठी रु. ४५००/- प्रति हेक्टर, बागायत पिकांकरीता रु. ९०००/-प्रति हेक्टर तर, फळपिकांकरिता रु. १२०००/- प्रति हेक्टर याप्रमाणे बाधित शेतक-यांना मदत जाहीर करण्यात आलेली आहे.

टंचाईसदृश्य परिस्थितीमुळे बाधित क्षेत्रास मदत देण्याकरिता मेमोरेंडम केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. राज्य शासनाच्या राज्य आपत्ती निवारण निधीमधून रक्कम रु.४००० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असून मदत वाटपाची कार्यवाही महसूल यंत्रणेमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

**परभणी जिल्ह्यातील समाधान योजनेच्या असमाधानाबाबत**

**(४५) ४४४१ (२२-१२-२०१४). श्री. विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हास्तरीय प्रमुख अधिकाऱ्यांची महिन्यातून एक दिवस तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस खेड्यामध्ये मुक्काम करुन जनसंवाद कार्यक्रम तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी परभणी यांनी सन २०१४ दरम्यान काढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी परभणी यांच्या आदेशास डावलून जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात कृती न करता केवळ कागदोपत्री सोपस्कार पार पाडल्याने ग्रामीण भागातील जनतेला या योजनेचा कोणताही लाभ होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोणत्या अधिकाऱ्यांनी या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करुन जनेतच्या समस्यांचे निकारण केल्याबाबतची वस्तूस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०५-२०१५) :** (१), (२) व (३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दि.२०.०५.२०१४ रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्यासह इतर जिल्हास्तर खाते प्रमुख यांना आपआपल्या दुस-या शुक्रवारी रात्रीचा मुक्काम करुन जनसंवाद कार्यक्रम तसेच त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या.

यानुसार जिल्हाधिकारी, परभणी यांनी मौ.कोळेवाडी ता.पालम येथे दि.२३.५.२०१४ रोजी वरील अधिका-यांनी मुक्कामास उपस्थित राहण्याबाबत दिनांक २२.५.२०१४ रोजी आदेश दिले होते.

जिल्हाधिका-यांच्या आदेशानुसार जिल्हा. उप विभाग आणि तालुका स्तरावरील विविध विभाग /उपविभाग/तालुका प्रमुख आणि स्थानिक अधिकारी मौ.कोळेवाडी ता.पालम येथे मुक्कामी हजर होते. सदरच्या मुक्कामातग्रामस्थांना शासनाच्या विविध योजनांची माहिती विविध कार्यालय प्रमुखांकडून देण्यात आली व ग्रामस्थांनी विचारलेल्या विविध प्रश्नांवर, अडचणींवर सर्व संबंधितांनी योग्य मार्गदर्शन केले तसेच ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेऊन त्याचे निराकरण केले.

वरीलप्रमाणे परभणी जिल्ह्यातील विधि तालुक्यात रात्रीचे मुक्काम घेण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुधागड तालुक्यातील (जि.रायगड) शाळेतील मुली सायकलीपासून वंचित असल्याबाबत**

**(४६) ५२१६ (०९-०४-२०१५). श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड तालुक्यातील (जि.रायगड) शाळेतील मुलींसाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत सायकली घेण्यासाठी निधी शिक्षणाधिकारी यांचेकडे जमा असूनसुध्दा काही शाळांमधील मुली सायकलीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात किती मुलींना सायकलीसाठी निधी देण्यात आला व किती मुली सायकलीपासून वंचित आहेत,

(३) असल्यास, सायकलीपासून वचित असलेल्या मुलींना निधी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-०५-२०१५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) सन २०१४-१५ मध्ये मानव विकास कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यामधील सुधागड तालुक्यातील एकूण ५५० मुलींपैकी ५३४ मुलींना सायकली पुरविण्यात आल्या आहेत. उर्वरीत १६ पैकी एका मुलीने सायकल खरेदी केली नाही. तसेच दोन विद्यार्थीनींना सायकल चालविता येत नसल्याने व तेरा मुली सातत्याने गैरहजर असल्याने याचा लाभ देण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात नरबळी, जादूटोणा, अघोरी विद्या या सारख्या घडत असलेल्या घटना रोखण्याबाबत**

**(४७) ५२७४ (०६-०४-२०१५). श्री. संग्राम थोपटे (भोर), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. राहुल बोंद्रे (चिखली), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री. संतोष दानवे (भोकरदन), श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नरबळी व इतर अमानुष अनिष्ट अघोरी प्रथा तसेच जादूटोणा प्रतिबंधक व उच्चाटन कायदा सन २०१३ मध्ये अस्तित्वात येवूनही आजही अशा प्रकारच्या घटना घडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घडत असलेल्या घटना रोखण्याबाबत तसेच सदर कृत्य करणा-यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१५) :** (१) होय.
(२) जादूटोणाविरोधी कायदा अंमलबजावणी अधिक सक्रियतेने होण्याकरिता राज्यातील सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांना सामाजिक न्याय व विशेष पोलीस महानिरीक्षक यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्याशी संपर्क साधून आवश्यक असलेले प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईसह राज्यातील तुरुंगातील सर्व पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही लावण्याबाबत

**(४८) ५२८१ (०७-०४-२०१५). श्री. संग्राम थोपटे (भोर), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. नसीम खान (चांदिवली), प्रा. वर्षा गायकवाड (धारावी), श्री. त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री. शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यातील तुरुंगातील कैद्यांच्या मृत्यूची संख्या दिवसे दिवस वाढत असल्याने सर्व कारागृहात व पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही लावण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाचे शासनास आदेश असतानाही सीसीटीव्ही लावण्यात आले नसल्याचे, माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सीसीटीव्ही लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०५-२०१५) :** (१) फौजदारी रिट याचिका क्र.२११०/२०१४ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमधील प्रत्येक कॉरीडॉर, खोली व लॉकपमध्ये रोटेटींग कॅमे-यासह सीसीटीव्ही लावुन त्याची एक वर्षापर्यंत देखभाल करण्याचे आदेश दि.१३.०८.२०१४ रोजी दिले आहेत.
(२) व (३) **पोलीस विभागः-** सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने यासंदर्भातील आर्थिक तरतूदींचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

**कारागृह विभागः-** केंद्र शासनाच्या १३ व्या वित्त आयोगातंर्गत कारागृह सुरक्षा व्यवस्थेमध्ये सुधारणा अंतर्गत आतापर्यंत मुंबई मध्यवर्ती कारागृहात ९८, येरवडा मध्यवर्ती कारागृहात ११३ व तळोजा मध्यवर्ती कारागृहात ७४ नग सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, जिल्हाधिकारी यांचे निधीमधून राज्यातील १३ कारागृहामध्ये ३३४ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, राज्यातील उर्वरित कारागृहात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही टप्प्या-टप्प्याने पूर्ण करण्यात येत आहे.

---

**राज्यात शालेय स्तरावर क्रीडा स्पर्धकांवर उपचार करणेबाबत**

**(४९) ५३१७ (०९-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री. राहुल बोंद्रे (चिखली), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री. डी.एस.अहिरे (साक्री), डॉ. पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय स्तरावर क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात असून यात जखमी होणाऱ्या बाल स्पर्धकांवर उपचार होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्पर्धेत जखमी झालेल्या स्पर्धकांवर येणारा औषध व दवाखान्याचा खर्च जिल्हा परिषदेने द्यावा, अन्यथा या स्पर्धाच बंद कराव्यात अशी मागणी जिल्हा सदस्यांनी केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०५-२०१५) :** (१) राज्यात जिल्हा परिषदे अंतर्गत झालेय स्तरावर विविध क्रिडा स्पर्धाचे आयोजन केले जाते.

सदर क्रिडा स्पर्धामध्ये जखमी झालेल्या स्पर्धकांना स्पर्धेच्या ठिकाणी तसेच नजीकच्या शासकीय रुग्णालयामध्ये दाखल करुन योग्य उपचार करुन घेतला जातो.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामविकास विभागातर्फे मुंबईतील पंचातारांकित हॉटेलमध्ये जिल्हापरिषदांच्या मुख्याधिका-यांची दोन परिषद आयोजित करण्यात आल्याबाबत**

**(५०) ५३५९ (०६-०४-२०१५). श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. रमेश कदम (मोहोळ), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. हसन मुश्रीफ (कागल), श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. किसन कथोरे (मुरबाड), प्रा. विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हापरिषदांच्या विविध योजनांवर विचारमंथन करण्यासाठी ग्रामविकास विभागातर्फे मुंबईतील पंचातारांकित हॉटेलमध्ये जिल्हापरिषदांच्या मुख्याधिका-यांची दोन परिषद आयोजित करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तिजोरीत खडखडाट असल्याचे बोलले जात असताना नाहक खर्च करण्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१५) :** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची दि.१२ व १३ जानेवारी, २०१५ या दोन दिवसांची कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळेचे उद्घाटन मा.मंत्री, ग्रामविकास यांनी केले असून मा.राज्यमंत्री, ग्रामविकास हे कार्यशाळेचे अध्यक्ष होते.

(२) सदर कार्यशाळेच्या आयोजनासाठी नाहक खर्च झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.